महाराष्ट्र शासन
# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे
दूरध्वनी क्र.०२०-२५६५६२३४/२५६५७१७६
Email ID : ropune@dtemaharashtra.gov.in
४१२-ई, शिवाजीनगर, पुणे - ४११ ०१६.

जा. क्र : तंशिविकापु/विवि-४/संकीर्ण/२०२२/ ५१२४ दिनांक 01 NOV 2022

**परिपत्रक-**

**प्रति,**
प्राचार्य,
या विभागीय कार्यालयाच्या
अधिनस्त व्यावसायिक अभ्यासक्रम राबविणाऱ्या सर्व संस्था
पुणे विभाग, पुणे.

**विषय : संचालनालयाच्या अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये याबाबत कार्यवाही करणेबाबत.**

संदर्भ- तंत्रशिक्षण संचालनालय महाराष्ट्र राज्य मुंबई यांचे पत्र क्र.१०/एडीएम/विद्यार्थी समुपदेशन/२०२२/८९३ दि.२१.१०.२०२२

उपरोक्त विषयास अनुसरून संदर्भिय पत्राच्या अनुषंगाने या विभागीय कार्यालयाच्या अधिनस्त संस्थांना कळविण्यात येते की, काही दिवसांमध्ये विद्यार्थ्यांची आत्महत्याबाबतची प्रकरणे महाविद्यालयांमध्ये आढळून आलेली आहेत. पुष्कळदा आत्यंतिक नैराश्यामुळे, मनात उद्भवलेल्या मानसिक अस्वस्थतेमुळे (उदा. वैफल्य, छिन्न मनस्थिती इत्यादी) तसेच परीक्षेच्या भितीमुळे विद्यार्थी आत्महत्येस प्रवृत्त होतात. तणाव, दुर्देवाने वाटयाला आलेली आर्थिक संकटे, वैयक्तिक नातेसंबंधांतील गुंते यांचाही यात वाटा असू शकतो. अशा वेळी जर त्याला योग्य असे मानसिक पाठबळ, मार्गदर्शन मिळाले नाही, तर तो स्वतःला संपविण्याचा प्रयत्न करतो. आत्महत्या करणारी व्यक्ती परीक्षांमधील अपयश, पालकांच्या आणि स्वतःच्या अपेक्षा पूर्ण करता न येणे, विस्कळीत बालक-पालक नाते, स्वतःच्या स्वतःकडून असणाऱ्या अतिरेकी आणि अवास्वत अपेक्षा अशा वेगवेगळया कारणांमुळे प्रचंड तणावात असते. त्यातून ती व्यक्ती असे टोकाचे पाऊल उचलते, असे आढळून येत आहे.

त्या अनुषंगाने शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत असलेले असे विद्यार्थी त्यांच्या वागण्याबोलण्यातून ओळखून त्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये, याबाबत कार्यवाही करणे आवश्यक आहे. **याकरिता संस्थेमध्ये ठराविक कालांतराने मानसशास्त्रज्ञांचे कार्यक्रम /शिबीर राबविणे गरजेचे आहे. विद्यार्थ्यांमधील शारीरिक, मानसिक आणि भावनिक संतुलन दृढ करणे, यशस्वी होण्यासाठी विद्यार्थ्यांचा स्वतःच्या क्षमतेवर असलेला विश्वास वाढविणे, विद्यार्थ्यांची एखादया समस्येचा/ संकटाचा सामना करण्याची पद्धत जाणून घेऊन त्यांना मार्गदर्शन करणे यास्तव संस्थेमध्ये विविध व्याख्याने, शिबीरे, कार्यक्रम आयेजित करणे आवश्यक आहे. शैक्षणिक संस्थांमध्ये विद्यार्थी-शिक्षक दत्तक योजना (mentor-mentee) राबविण्याची आवश्यकता आहे. विद्यार्थ्यांच्या चिंता, तणाव, परीक्षेची भीती, होमसिकनेस आणि इतर शैक्षणिक चिंता या समस्यांचे निराकरण करण्यासाठी अध्यापकांनी कौन्सिलिंग करण्याची गरज आहे.**

उपरोक्त बाबींचा विचार करून आपण आप-आपल्या शैक्षणिक संस्थांमध्ये शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या मनात आत्महत्येचा विचार येऊ नये, याकरीता संस्थांमध्ये वरीलप्रमाणे विविध उपक्रम वर्षभर राबविण्याचे नियोजन करून हे उपक्रम यशस्वीपणे राबविण्यात यावे. व उपक्रम राबविल्यानंतर त्याबाबतचा अहवाल या कार्यालयास सादर करण्यात यावा.
सोबत- संदर्भिय पत्र.

**( डॉ. द.व्यं.जाधव )**
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, पुणे

प्रत- प्रोग्रामर, तं.वि.का. पुणे यांना तंत्रशिक्षण विभागीय कार्यालयाच्या संकेतस्थळावर प्रदर्शित करण्यासाठी.